**बातमीपत्र**

**पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दिनांक २१ सप्टेंबर**

**फौजदार चावडी  पोलीस ठाणे**

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | ५७७/२०१७ भादंविसक ३७९,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | २०/०९/२०१७ रोजी १७.०० वा. फिर्यादी चे राहते घरी चिंचनगर झोपडपट्टी, स्वामी समर्थ मंदिरा समोर, सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | २०/०९/२०१७ रोजी २२.५८ वा. |
| **फिर्यादी** | : | कस्तुरबाई शत्रुगन पोळ,वय ४५, रा. सदर |
| **आरोपीचे नांव** | : | ऋषीकेश ऊर्फ चिंग्या जाधव, सदर |
| **गेला माल** | : | २,०००/-रु व दोन लोखंडी पलंग |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की बाजुस नमुद तारखेस वेळी व ठिकाणी,यातील फिर्यादी ही घर सारवण्याचे काम करित असताना, घरातील प्रापंचीक सामान व दोन लोखंडी पलंग बाहेर ठेवले असताना,सायंकाळी ०६.०० वा सामान पुन्हा घरात ठेवण्याकरिता आणण्यासाठी गेले असता त्याठिकाणी लोंखंडी पलंग नसल्याचे लक्षात आले.सादर बाबत विचारत असताना घरा शेजारी राहणारे पांडुरंग कोळेकर यांनी सदर दोन लोखंडी पलंग हे  ज्योतीराम आवताडे यांचे रिक्षातुन नमुद आरोपीतांने त्याचे तीन साथीदारासह घेवून गेल्याचे सांगीतले म्हणुन. तपासः- पोना/१४०५/गायकवाड |

**जेलरोड  पोलीस ठाणे**

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | ३८७/२०१७ भादंविसक ३७९ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | २०/०९/२०१७ रोजी १२.३० वा चे दरम्यान, सेंट्रल बँक ऑफ इंडिया,शाखा अक्कलकोट रोड,भद्रावती पेठ, सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | २०/०९/२०१७ रोजी १९.२६ वा. |
| **फिर्यादी** | : | सत्यनारायण किष्टय्या अन्नलदास,वय-५५, रा. गोदुताई विडी घरकुल ५२७/१,सी ता. द. सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | ५०,०००/- रु रोख रक्कम व महत्वाची कागदपत्रे. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की बाजुस नमुद तारखेस वेळी व ठिकाणी,यातील फिर्यादीचा वरील वर्णनाचा ऐवज ठेवलेली पीशवी ही कोणीतरी आज्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमत्तीशिवाय मुद्दाम लबाडीने चोरून नेली म्हणुन. तपासः- सफौ./जमादार |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | ४३५/२०१७ भादंविसक ३२६,३२७,१४३,१४७,१४८,१४९, मुपोकाक.१३५,प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | २०/०९/२०१७ रोजी १२.३० वा. श्रावीका शाळे समोर रोडचे कडेस सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | २०/०९/२०१७ रोजी २२.५३ वा. |
| **फिर्यादी** | : | रोहित दिपक खिलारे, वय ३१, रा. ४१/२१,विर फकीरा चौक न्यु.बुधवार पेठ,सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | : | जयंत जगदाळे, २. पराग काळे, ३. सिध्दांत काळे, ४. भिमराव ऊर्फ सोनु कांबळे, ५. विकी सरवदे व इतर दोन साथीदार. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की बाजुस नमुद तारखेस वेळी व ठिकाणी,यातील फिर्यादी व त्याचा भाऊ भारत किशोर खिलारे असे दोघे गप्पा मारत उभे असतानसा त्यावेळी नमुद आरोपी हे फिर्यादी जवळ येवून आज रोजी सकाळी ०९.३० वा चे सुमारास संभाजी प्रशाला मुरारजी पेठ सोलापूर येथे मोटार सायकलचा धक्का लागल्याचे कारणांवरुन व त्याचा राग मनात धरुन फिर्यादी व फिर्यादीचे भावास तुम्हाला लई मस्ती आली तुमचे आता बघतोच अशी दमदाटी शिवीगाळ करून नमुद आरोपी क्रं.१याने त्यांचे त्यांचे हातातील लोखंडी रॉडने फिर्यादीचे डोकीत तसेच आरोपी क्रं.३ याने त्यांचे हातातील लोखंडी रॉडने फिर्यादीचा भाऊ भारत यांचे डोकीत मारून गंभीर जखमी केले तसेच आरोपी क्रं.२ याने दगडाने फिर्यादी व फिर्यादीचे भावास मारहाण केली तसेच आरोपी क्रं.४,५ व दोन आनोळखी आरोपीतांनी फिर्यादीस हाताने व लाथाबुक्यांने मारहाण करून फिर्यादीचे खिशातील फिर्यादीचे पत्नीचे अर्धा तोळयाचे सोन्याचे मणी मंगळसुत्र कि.अ.१०,०००/-रु चे मारहाणीत तेथेच पडल्याने नमुद आरोपी पैकी कोणीतरी घेवुन गेले.तपास:- सपोनी/मोहिते. |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | मॅ.प्र.ख.नों.नं.५३४/२०१७ भादंविसक ४२०,४६३,५०४,५०६,१९०,१९३,प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | सन २०१३ साली,देगांव नं.२, वि.स.सेवा सहकारी सोसायटी ता. उ. सोलापूर तरटी नाका पोलीस चौकी जवळ सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | २०/०९/२०१७ रोजी २२.५४ वा. |
| **फिर्यादी** | : | सुनिल अरविंद जोशी वय ४९, रा. प्लॉट नं.१,दिपशिखा अपार्टमेंन्ट गैबीपीर दर्गा जवळ,होटगी रोड सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | : | किरण अरविंद जोशी वय ४५, रा. प्लॉ नं.२६, भिमा नगर जवळ,सोलापूर |

| | | |
|---|---|---|
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की बाजुस नमुद तारखेस वेळी व ठिकाणी,यातील फिर्यादी व आरोपी हे सख्खे भाऊ असून त्यांची आई सुजाता अरविंद जोशी यांचे मध्ये वडीलोपार्जीत मौजे देगांव ता. उत्तर सोलापूर गट नं.७९/८अ,८९/८क,८९/९अ,१.८९/९/अ२,७८/५,७६/७,येणे प्रमाणे वर्णनाची मालकी वर्णनाची शेत जमीन आहे.आरोपी हा सदर शेत जमीनीवर स्वता:चे लाभा करिता फिर्यादी यांचे जमीनीवर मौजे देगांव २,वी.स.सेवा सहकारी सोसायटी ता. उ. सोलापूर जवळील तरटी नाका पोलीस चौकी जवळ सोसायटीतुन फिर्यादी व त्यांची आई यांचे बनावट सही व बनावट कागदपत्र गैर मार्गाने त्रयस्त व्यक्ती कडुन खोटे व बनावट प्रतीज्ञापत्र तयार करून व पुराव्या कामी दाखल करून ६,००,०००/- रु चे कर्ज काढुन घेवुन फसवणुक केली आहे.तसेच फिर्यादी शेतात गेल्या नंतर शेतात येवु देत नाही व शिवीगाळ करून दमदाटी करतो म्हणुन तपासः- पोसई/करंडे |